सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय गडचिरोली यांचे कार्यालय**

**OFFICE OF THE DISTRICT DEPUTY COMMISSIONER OFANIMAL HUSBANDRY & DAIRYING, GADCHIROLI**

**पोष्ट ऑफीस समोर चामोर्शि रोड गडचिरोली -442605**

E-Mail :- ddcah.gadchiroli@gmail.com Telephone No:- 07132-233361

**जावक क्रमांक-जिपउआ/बदक खाद्यघटक दरपत्रक/ 4027 /2026 गडचिरोली दिनांक 07/10/2026**

**प्रति,**

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

**विषय - बदक पैदास प्रक्षेत्र, वडसा (दे.) या प्रक्षेत्राकरिता बदक खाद्यघटक खरेदीकरिता दरपत्रके पाठविण्याबाबत**

**संदर्भ** –जा.क्र./प्रापसआ/नियोजन/ता.स.स. सभा/५२१२/२०२६,नागपूर, दिनांक- ०६/१०/२०२६ .

वरिल विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गडचिरोली या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या बदक पैदास प्रक्षेत्र, वडसा (दे.) जिल्हा गडचिरोली या प्रक्षेत्राकरिता सन २०२६-२७ या वर्षाकरिता (दिनांक ०१ ऑक्टोबर २०२६ ते दिनांक ३१ मार्च २०२७ या कालावधीकरिता) गहू(चांगल्या प्रतीचा), सोयाबीन मिल, फिश मिल,DORB व शेल ग्रीट या बदक खाद्यघटकाची खरेदी करावयाची आहे. तरी बदक खाद्यघटकाचे दरपत्रक (Quotation) खालिल नियम, अटी व शर्तीचे अधिन राहून बंद लिफाफ्यात दिनांक 19.10.2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गडचिरोली यांचे नावे **बदक पैदास प्रक्षेत्र, वडसा (दे.) जिल्हा गडचिरोली पिन-**441207 यांचेकडे पाठविण्यात यावेत. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 21.10.2026 रोजी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, गडचिरोली यांचे कार्यालयात दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील.

**सहपत्र - नियम, अटी व शर्ती**

7.10.26

**(डॉ.सुधीर बी. मठवाले)**
**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**गडचिरोली**

## नियम, अटी व शर्ती

1) दरपत्रक मुदतीत सादर करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. उशिराने प्राप्त होणाऱ्या दरपत्रकाचा विचार केल्या जाणार नाही.
2) दरपत्रकात पुरवठयाचे दर प्रती क्विंटल रूपये नमुद करावे. सदर दरामध्ये सर्व करांचा समावेश असावा.
3) सादर केलेले दर दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२७ या कालावधीकरिता वैध असावेत.
4) खाद्यघटक आदेश प्राप्तीनंतर पुरवठा आदेशात नमुद केल्यानुसार आठ दिवसाचे आत पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. खाद्यघटक बिना बारदाना वजनाने पुरवावा लागेल.
5) खाद्यघटक संस्थेस स्वखर्चाने पोहोचवून, मोजणीनंतर योग्य ठिकाणी रचून ठेवणे संबंधित पुरवठादारास बंधनकारक राहील.
6) दरपत्रकासोबत खाद्यघटकाचा 1 (एक) किलो मोहोरबंद नमुना समितीकडे निरिक्षणाकरिता देणे आवश्यक आहे. पुढील पुरवठा नमुन्यानुसारच करणे बंधनकारक राहील.
7) दरपत्रकासोबत पुरवठाधारकाने फर्मचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नंबर, पुरवठाधारकाचे पॅन नंबर व सन २०२४-२५ या वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
8) ज्यांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी दरपत्रक मंजूरीचे 7 (सात) दिवसांचे आत सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझीट) दरपत्रक मालाचे 5 टक्के रक्कम सरकारी खजिन्यात भरून मूळ चालान या कार्यालयास सादर करावे लागेल.
9) पुरवठा केलेले खाद्यघटक परिक्षणाअंती अफ्लाटॉक्सीन (विषद्रव्य) व बुरशीचे दृष्टीने अयोग्य असल्यास परत करण्यात येईल व तो दरपत्रक धारकास स्वखर्चाने बदलून अफ्लाटॉक्सीन (विषद्रव्य) विरहीत खाद्यघटक पुरवावे लागेल.
10) वरीलप्रमाणे नमुद केलेली खाद्यघटकाची गरज अंदाजित असुन त्याप्रमाणे खरेदी करण्याचे बंधन संस्थेवर नाही. खाद्यघटक पुरविण्यासंबंधी पक्षीसंख्याचे अनुषंगाने एक महीन्यांचे खाद्यघटक पुरविण्यासंबंधी एकावेळी आदेश काढण्यात येईल.
11) खाद्यघटक अवेळी पोहोचविल्याने पुरवठाधारकाचा खोळंबा झाल्यास सबबीला कार्यालय जबाबदार राहणार नाही. खाद्यघटक कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत पुरवठा करावा.
12) पुढील वर्षाचा खाद्यघटक पुरवठयाचा करार होईपर्यंत आवश्यकता भासल्यास मालाचा पुरवठा करणे मंजूर दरपत्रक धारकास बंधनकारक राहील.
13) दरपत्रक नियुक्त समितीसमोर उघडण्यात येतील. तसेच दरपत्रक मान्य करणे अथवा नाकारणेचा हक्क काही कारण न देता समितीचा राहील.
14) मालाची रक्कम माल पुरविल्यानंतर देयकाचे भुगतान आर्थिक तरतुदीनुसार करण्यात येईल.
15) दरपत्रक मंजूर झाल्यास रूपये 200 /- (दोनशे रूपये फक्त) च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.
16) दरपत्रक लिहीलेल्या रकमेत / दरात खाडाखोड नसावी. तसेच दर शाईने अथवा बॉल पॉईंट पेनने लिहावे. पेन्सीलने लिहीलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
17) खाद्यघटक खरेदी अथवा ईतर बाबींवर वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा गडचिरोली यांचेकडे राहील.
18) वरील अटी शिथिल करण्याचा अथवा त्यात फेरबदल करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी राखून ठेवलेला आहे.

7.10.26

**(डॉ.सुधीर बा. मठवाले)**
**जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**गडचिरोली**